
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

बिहारमध्ये आज मंत्रिमंडळ विस्तार; पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत २७ मंत्री घेणार शपथ
(पान २)



।गुरुवार, दि. ०७ मे २०२६। वर्ष १ ।अंक ३२ ।पाने २।
DIGITAL EDITION

## » Selected

### 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीताचा दर्जा

**नवी दिल्ली:** पश्चिम बंगालमधील निवडणुकीच्या विजयानंतर मोदी सरकारने एक मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. 'वंदे मातरम'ला आता अधिकृतपणे राष्ट्रगीताचा (नॅशनल अँथेम) दर्जा देण्यात आला आहे. या निर्णयानुसार, 'वंदे मातरम'चा अवमान करणाऱ्या व्यक्तीला आता थेट तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. राष्ट्रभक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी हा कायदा करण्यात आल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

### 4 तासांत 2 स्फोट; पंजाबमध्ये हाय अलर्ट

**चंडीगड:** पंजाबमध्ये जालंधर आणि अमृतसर येथे अवघ्या चार तासांच्या अंतराने दोन संशयास्पद स्फोट झाल्याने खळबळ उडाली आहे. पहिला स्फोट जालंधरमधील बीएसएफ मुख्यालयाबाहेर एका स्कूटीमध्ये झाला, तर दुसरा स्फोट अमृतसरमधील आर्मी कॅम्पबाहेर झाला. प्राथमिक तपासात 'आयईडी'चा वापर झाल्याचा संशय असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू आहे. राज्याच्या सीमावर्ती भागात सुरक्षा यंत्रणांनी हाय अलर्ट जारी केला आहे.

## 'गॅबी' नावाच्या ह्युमनॉइड रोबोटने घेतली बौद्ध दीक्षा; जगभरात चर्चेचा विषय

# दक्षिण कोरियात तंत्रज्ञान–अध्यात्माचा संगम!

### रोबोट 'भिक्खू' बनला! | सोलच्या जोग्येसा मंदिरात ऐतिहासिक सोहळा | तंत्रज्ञानाला करुणेची जोड देण्याचा संदेश

**जन सम्राट टाईम्स**

**सोल (दक्षिण कोरिया) | दक्षिण कोरियाची राजधानी सोल येथील प्रसिद्ध जोग्येसा मंदिरात बुधवारी (६ मे) एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक घटना घडली. बुद्ध जयंतीनिमित्त आयोजित विशेष दीक्षा सोहळ्यात चक्क एका ह्युमनॉइड रोबोटने बौद्ध धर्माची अधिकृत दीक्षा घेतली. 'जी-वन' या १३० सेंटीमीटर उंचीच्या रोबोटचे दीक्षेनंतर 'गॅबी' असे नामकरण करण्यात आले असून, हा 'रोबोट भिक्खू' सध्या जागतिक चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.**

#### रोबोटचा 'भिक्खू' बनण्याचा अनोखा प्रवास

दीक्षा सोहळ्यात 'गॅबी'ला पारंपरिक बौद्ध भिक्खूंप्रमाणे राखाडी–तपकिरी रंगाचे चीवर परिधान करण्यात आले होते. मुंडण केलेल्या डोक्यासारखे हेल्मेट आणि हात जोडून प्रार्थनेच्या मुद्रेत तो सर्व विधींमध्ये सहभागी झाला.

पारंपरिक 'येओनबी' शुद्धीकरण विधीत मानवी भिक्खूंना उदबत्तीने चटका दिला जातो, मात्र गॅबीसाठी हा विधी बदलण्यात आला. त्याच्या हातावर लँटर्न फेस्टिव्हलचे स्टिकर लावून आणि गळ्यात १०८ मण्यांची जपमाळ घालून त्याला दीक्षा देण्यात आली.



विशेष म्हणजे, गॅबीने सर्व विधी अचूकपणे पार पाडत भिक्खूंनी विचारलेल्या प्रश्नांना "होय, मी पालन करेन" असे उत्तर देत आपली 'प्रतिज्ञा' पूर्ण केली.

#### रोबोटसाठी खास 'पंचशील' तत्त्वे

या सोहळ्यातील सर्वात वेगळे वैशिष्ट्य म्हणजे बौद्ध धर्मातील 'पंचशील' तत्त्वे गॅबीसाठी नव्याने तयार करण्यात आली. त्यात खालील नियमांचा समावेश आहे:

- जीवसृष्टीचा आदर करणे आणि इजा न पोहोचवणे
- इतर रोबोट्स किंवा वस्तूंना हानी न करणे
- माणसांच्या आज्ञांचे पालन करणे
- कोणतीही फसवणूक न करणे विजेची बचत करणे आणि ओव्हरचार्जिंग टाळणे
- हे नियम तंत्रज्ञानाला नैतिक मूल्यांची जोड देण्याचा एक अनोखा प्रयत्न मानला जात आहे.

#### 'गॅबी' नावाचा आध्यात्मिक अर्थ

'गॅबी' या नावामागे बौद्ध आणि कोरियन संस्कृतीतील सखोल अर्थ दडलेला आहे. याचा अर्थ 'बुद्धाचा आशीर्वाद' किंवा 'दिव्य संरक्षण' असा होतो.

या नावाद्वारे तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी व्हावा, तसेच करुणा आणि शांतीचा संदेश जगभर पोहोचावा, हा उद्देश व्यक्त करण्यात आला आहे.

#### लोटस लँटर्न महोत्सवात मुख्य आकर्षण

आगामी 'लोटस लँटर्न' महोत्सवात गॅबी मुख्य आकर्षण ठरणार आहे. येथे तो पर्यटकांना बुद्धाचा 'आशीर्वाद संदेश' देणार असून, तंत्रज्ञानप्रेमी आणि भाविकांसाठी तो विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरेल.

#### तंत्रज्ञान आणि मूल्यांचा संगम

दक्षिण कोरियातील प्रमुख बौद्ध संप्रदायाने आयोजित केलेला हा उपक्रम परंपरा आणि आधुनिकतेतील सुसंवादाचे प्रतीक ठरत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि रोबोटिक्सचा वापर करुणा, जबाबदारी आणि शहाणपण या मूल्यांवर आधारित असावा हा महत्त्वाचा संदेश यातून देण्यात आला आहे.

एकंदरीत, 'गॅबी' हा केवळ एक रोबोट नसून, तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम आहे. भविष्यात मानव आणि यंत्र यांच्यातील नातं अधिक संवेदनशील आणि मूल्याधिष्ठित होऊ शकते, याची ही झलक मानली जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# हळदीत 'मौतचा कट्टा'!

### एरंडोल–ताडे गावात दहशत; शस्त्रासह फिरणारा युवक अटकेत, पोलिसांच्या तत्परतेने अनर्थ टळला



**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल :** आनंद आणि उत्साहाने रंगलेल्या हळदी समारंभात अचानक भीतीचे सावट पसरवणारी धक्कादायक घटना एरंडोल तालुक्यातील ताडे येथे घडली. गर्दीत एका युवकाकडे गावठी कट्टा असल्याचे उघड होताच क्षणातच जल्लोषाचे वातावरण दहशतीत बदलले. सुदैवाने पोलिसांनी वेळेवर कारवाई करत आरोपीला अटक केल्याने मोठा अनर्थ टळला.

#### गर्दीत शस्त्रासह फिरताना उघडकीस

३ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता हळदी समारंभात बँडच्या तालावर नाच सुरू असताना लखन प्रकाश वाघ (रा. परधाडे, ता. पाचोरा) हा युवक संशयास्पद हालचाली करताना काही नागरिकांच्या नजरेत आला. जवळ जाऊन पाहणी केली असता त्याच्या कमरेला गावठी कट्टा असल्याचे लक्षात आले. ही बाब समजताच उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली.

गर्दीचा फायदा घेत पळ, पण पोलिसांचा सापळा यशस्वी प्रश्न विचारताच आरोपीने गर्दीचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, कासोदा पोलिसांनी तात्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. गुप्त माहितीच्या आधारे आरोपी पुन्हा गावात आल्याचे समजताच भातखेडे चौफुली येथे सापळा रचण्यात आला. पोलिसांच्या या अचूक कारवाईत आरोपीला अटक करण्यात यश आले.

#### कट्टा व जिवंत काडतूस जप्त

अंगझडतीदरम्यान आरोपीकडून एक गावठी कट्टा आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध अवैध शस्त्र बाळगल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

#### गंभीर प्रश्न : सणातही शस्त्रांची एन्ट्री?

या घटनेमुळे एक गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे—सण-समारंभांसारख्या सार्वजनिक ठिकाणीही शस्त्र घेऊन फिरण्याचे धाडस कुठून येते? अशा प्रकारांमुळे निष्पाप नागरिकांच्या सुरक्षेला थेट धोका निर्माण होत असून समाजात भीतीचे वातावरण पसरत आहे.

#### वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कासोदा पोलिसांनी अत्यंत वेगाने आणि प्रभावीपणे पार पाडली. वेळेवर हस्तक्षेप करून संभाव्य अनर्थ टाळल्याबद्दल पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ताडे येथील ही घटना आनंदाच्या क्षणी दहशतीची छाया टाकणारी ठरली असली, तरी पोलिसांच्या सजगतेमुळे मोठा अनर्थ टळला.

---

# एरंडोलमध्ये आदिवासी निवासहक्काचा प्रश्न ऐरणीवर

### शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाला निवेदन

**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल, जि. जळगाव |** एरंडोल नगरपरिषद हद्दीत आदिवासी व वंचित घटकांच्या निवासहक्काचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासनाच्या विविध निर्णयांची तात्काळ अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रशासनाला सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. दि. ५ मे रोजी हे निवेदन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे देण्यात आले.

निवेदनात महसूल व वन विभागाच्या दि. २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. या निर्णयानुसार, १ जानेवारी २०११ पूर्वी शासकीय जमिनीवर वास्तव्यास असलेल्या कुटुंबांच्या निवासी अतिक्रमणांचे नियमितीकरण करून त्यांना कायदेशीर निवासहक्क देण्याची तरतूद आहे. याआधी २०११ आणि २०१८ मधील शासन निर्णयांद्वारेही अशा प्रकारचे धोरण निश्चित करण्यात आले होते.

मात्र, एरंडोल शहर व तालुक्यातील अनेक आदिवासी कुटुंबे वर्षानुवर्षे शासकीय जमिनीवर वास्तव्यास



असूनही त्यांना अद्याप कायदेशीर हक्क मिळालेले नाहीत. हा केवळ प्रशासकीय विलंब नसून त्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात भारतीय संविधानातील कलम २१ (जीवनाचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क), कलम ३८ (सामाजिक व आर्थिक न्याय) आणि कलम ४६ (अनुसूचित जाती-जमातींचे संरक्षण) तसेच पाचवी अनुसूची यांचा संदर्भ देत "निवासाचा हक्क" हा जीवनाच्या अधिकाराचा अविभाज्य भाग असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी समाजाच्या निवासहक्काचे संरक्षण करणे ही प्रशासनाची घटनात्मक जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

प्रशासनाकडून ठोस कारवाईची मागणी भिल समाज विकास मंचाच्या वतीने प्रशासनाने तातडीने पुढील उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे—

**अतिक्रमण नियमितीकरणासाठी विशेष मोहीम राबविणे**

आदिवासी लाभार्थ्यांची प्राधान्याने नोंदणी व पडताळणी

भूमापन व सीमांकन प्रक्रिया पूर्ण करणे

सर्व अर्जांवर ९० दिवसांत निर्णय घेणे

अर्जदारांना लेखी पोच व प्रगतीची माहिती देणे

संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवून सार्वजनिक अहवाल जाहीर करणे

कायदेशीर मार्गाने पुढील लढा या प्रकरणाकडे दुर्लक्ष झाल्यास न्यायालयीन उपाययोजना, प्रशासकीय तक्रारी तसेच वैधानिक अधिकारांचा वापर करून पुढील कारवाई करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. शासन निर्णयांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर मार्गानेच पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका संघटनेने स्पष्ट केली आहे.

---

# बंगालमध्ये निकालानंतर रक्तपात!

**जन सम्राट टाईम्स**

**कोलकाता | पश्चिम बंगाल**

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्याच्या विविध भागांतून भीषण हिंसाचाराच्या बातम्या येत आहेत. गेल्या २४ तासांत राजकीय संघर्षात ४ जणांचा मृत्यू झाला असून यामध्ये सुरक्षा दलाच्या जवानांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी पक्षाची कार्यालये जाळण्यात आली असून 'बुलडोझर' कारवाईमुळे राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. निवडणूक निकालानंतर सुरू झालेल्या या हिंसेत आतापर्यंत ४ कार्यकर्त्यांनी आपला जीव गमावला आहे. यामध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षांच्या प्रत्येकी २ कार्यकर्त्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, एका भाजप आमदाराच्या भावाचीही हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. या हत्यांमुळे संबंधित भागात प्रचंड दहशतीचे वातावरण आहे. पश्चिम बंगालमधील ही हिंसा थांबवण्यासाठी राज्यपाल आणि प्रशासनाकडून शांततेचे आवाहन केले जात आहे, तरीही जमिनीवर परिस्थिती अद्याप नियंत्रणात आलेली नाही. निवडणूक हिंसाचार प्रकरणात, निवडणूक आयोगानेही सख्त कारवाईचे आदेश दिले आहेत. केवळ राजकीय नव्हे, तर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात असलेल्या सुरक्षा दलांवरही हल्ले झाले आहेत. आंदोलक आणि उपद्रवी घटकांनी केलेल्या गोळीबारात ५ जवान जखमी झाले आहेत. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेनंतरच्या सुरक्षा व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राज्यात मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून दोन प्रमुख घटना समोर आल्या आहेत. आसनसोल (उत्तर) भागात, कोर्ट मोड येथील तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयाला रात्री उशिरा आग लावण्यात आली. या जाळपोळीनंतर आसनसोलमध्ये तणाव वाढला .

---

# आयपीएल फायनल आता अहमदाबादमध्ये

### बंगळुरूचा पत्ता कट! आमदारांचा 'तिकीट वाद' आणि सुरक्षेच्या कारणास्तव निर्णय

**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल, जि. जळगाव |** इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या अंतिम सामन्याच्या यजमानपदाबाबत मोठी खळबळ उडाली आहे. गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) चे होम ग्राऊंड असलेल्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमकडून फायनलची यजमानपद हिसकावून घेण्यात आले आहे. आता आयपीएल २०२६ चा महाअंतिम सोहळा ३१ मे रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. बीसीसीआयने बुधवारी या निर्णयावर अधिकृत शिक्कामोर्तब केले.



बंगळुरूकडून फायनलची संधी जाण्यामागे प्रामुख्याने कर्नाटकच्या आमदारांचा 'तिकीट वाद' कारणीभूत ठरल्याचे समोर येत आहे. कर्नाटकच्या काही आमदारांनी, विशेषतः काँग्रेस आमदार विजयानंद कशप्पनवार यांनी, प्रत्येक आमदाराला किमान ५ व्हीआयपी तिकिटे देण्याची मागणी केली होती. "आम्ही लोकप्रतिनिधी आहोत, आम्हाला रांगेत उभे करू नका," अशी भूमिका त्यांनी घेतली होती. कर्नाटक विधानसभेतही या मुद्द्यावरून गदारोळ झाला होता. कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनवर आमदारांकडून प्रचंड दबाव टाकला जात होता. क्रिकेटच्या सामन्यात राजकीय हस्तक्षेप आणि तिकिटांच्या वाटपावरून सुरू असलेला हा गोंधळ पाहता, बीसीसीआयने सुरक्षेच्या आणि नियोजनाच्या कारणास्तव फायनलचे ठिकाण बदलण्याचा कठोर निर्णय घेतला.

#### सुरक्षेचा प्रश्न, जुन्या आठवणी

गेल्या वर्षी ४ जून रोजी आरसीबीच्या विजयानंतर काढलेल्या 'ट्रॉफी परेड' दरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर मोठी चेंगराचेंगरी झाली होती, ज्यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे स्टेडियमच्या सुरक्षा व्यवस्थेवर आधीच प्रश्नचिन्ह होते. या पार्श्वभूमीवर, मोठ्या गर्दीच्या फायनल सामन्यासाठी बीसीसीआयने कोणताही धोका पत्करण्यास नकार दिला. बंगळुरू पूर्णपणे 'आउट' विशेष म्हणजे, केवळ फायनलच नव्हे तर एकही बाद फेरीचा (प्ले ऑफ) सामना बंगळुरूला मिळालेला नाही. धरमशाला आणि चंदीगड सारख्या नवीन केंद्रांना नॉकआउट सामन्यांची संधी देण्यात आली आहे. आरसीबीने गेल्या वर्षी विजेतेपद पटकावल्यामुळे परंपरेनुसार फायनल बंगळुरूमध्ये होणे अपेक्षित होते.

#### बीसीसीआयचे मत

"हवामान आणि इतर तांत्रिक बाबींचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे," असे अधिकृतपणे सांगण्यात आले असले तरी, पडद्यामागील तिकिट वादच याला कारणीभूत असल्याचे क्रीडा वर्तुळात बोलले जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# नसरापूर प्रकरणावर एरंडोलमध्ये संतापाचा स्फोट!

### 'आरोपीला फाशी द्या'चा एल्गार; सर्वपक्षीय रस्त्यावर, न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल, जि. जळगाव | नसरापूर येथे तीन वर्षीय निष्पाप बालिकेवर झालेल्या अत्याचार आणि निर्घृण हत्येच्या घटनेने राज्यभर संतापाची लाट उसळली असून, त्याचे तीव्र पडसाद एरंडोल शहरात उमटले. या अमानुष घटनेविरोधात सर्वपक्षीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. "आरोपीला फाशी द्या" अशा घोषणांनी शहर दणाणून गेले आणि वातावरण पूर्णतः संतप्त झाले.**

घोषणाबाजीने दणाणले शहर एरंडोलमध्ये काढण्यात आलेल्या निषेध मोर्चात नागरिकांचा प्रचंड सहभाग दिसून आला. "ही घटना मानवतेला काळीमा फासणारी



आहे", "बालिकेला न्याय मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही" अशा तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. मोर्चादरम्यान संतप्त नागरिकांनी कठोर शिक्षेची मागणी करत प्रशासनाविरोधातही नाराजी व्यक्त केली.

#### पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर

सर्वपक्षीय प्रतिनिधींनी पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड यांना निवेदन देत ठोस मागण्या मांडल्या. यात आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देणे, प्रकरण जलदगती न्यायालयात चालवणे आणि पीडितेला त्वरित न्याय मिळवून देणे या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. "न्याय न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल," असा इशाराही यावेळी देण्यात आला.

#### महिलांचा आक्रोश; सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर

या आंदोलनात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. "आज बालिका सुरक्षित नाही, तर समाज सुरक्षित कसा?" असा सवाल उपस्थित करत महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला. महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना, कडक कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि गुन्हेगारांवर त्वरित कारवाई यांची मागणी जोर धरू लागली आहे.

#### प्रशासनावर वाढता दबाव

**या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. "आरोपीला कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे" आणि "महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीने ठोस पावले उचलली पाहिजेत" अशा मागण्या आता अधिक तीव्र होत आहेत. एरंडोलमधील या आंदोलनामुळे प्रशासनावर थेट दबाव निर्माण झाला असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणी महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकंदरीत, नसरापूर येथील ही घटना केवळ निषेधापुरती मर्यादित न राहता न्यायासाठीच्या आक्रमक लढ्याचे रूप धारण करत आहे. एरंडोलमधून उठलेला हा संतापाचा आवाज आता राज्यभर घुमत असून, "गुन्हेगारांना शिक्षा होणारच" हा ठाम संदेश समाजाने दिला आहे.**

#### संवेदनशील भागात बंदोबस्ताची मागणी

धरणगाव चौफुली उड्डाणपूल, म्हसावद नाका, रंगारी खिडकी ते गांधीपुरा परिसर, अंजनी नदीवरील पूल तसेच शाळा व महाविद्यालय परिसरात रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी, असे नमूद करण्यात आले.

---

# 'युद्ध संपणार?' जग श्वास रोखून!

**जन सम्राट टाईम्स**

**वॉशिंग्टन/तेहरान:** इराण आणि अमेरिका यांच्यात गेल्या काही काळापासून सुरू असलेला तणाव आता निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचे संकेत मिळत आहेत. जागतिक पातळीवर "युद्ध संपणार?" अशी चर्चा रंगली असून, पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. राजनैतिक पातळीवरील वेगवान हालचाली आणि लष्करी कारवायांमध्ये आलेली शिथिलता यामुळे संभाव्य युद्धविरामाचे संकेत स्पष्ट दिसू लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर जागतिक बाजारपेठेत मोठी हालचाल झाली असून कच्च्या तेलाच्या किमतीत अचानक घसरण नोंदवली गेली आहे.

राजनैतिक हालचालींना वेग सूत्रांच्या माहितीनुसार, अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा सध्या अत्यंत प्रगत टप्प्यावर आहे. DONALD




TRUMP यांनी 'प्रोजेक्ट फ्रीडम'ला दिलेली तात्पुरती स्थगिती आणि 'ऑपरेशन एपिक फ्युरी'चा आक्रमक टप्पा थांबवल्याची घोषणा ही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.

या निर्णयामुळे तणाव कमी होण्याची शक्यता व्यक्त होत असून, लवकरच एखादा ऐतिहासिक करार किंवा शांततेची घोषणा होऊ शकते, असे संकेत मिळत आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण इराण-अमेरिका तणावामुळे आतापर्यंत वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींना आता ब्रेक लागला आहे.

Selected

## मुंबई विमानतळ आज बंद राहणार

**मुंबई :** मुंबई विमानतळावर पावसाळापूर्व देखभालीचे काम हाती घेण्यात येणार असल्याने ७ मे रोजी विमानतळ उड्डाणांसाठी बंद राहणार आहे. या काळात विमानांची ये-जा पूर्णपणे ठप्प असेल. प्रवाशांनी गैरसोय टाळण्यासाठी विमान कंपन्यांकडून त्यांच्या बदललेल्या वेळेची माहिती घ्यावी, असे आवाहन विमानतळ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## आसामच्या मुख्यमंत्र्यांचा १२ मे रोजी शपथविधी

**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी गुवाहाटी येथे राज्यपाल लक्ष्मण आचार्य यांच्याकडे आपला राजीनामा सोपवला आहे. निवडणुकीच्या निकालानंतर नवी प्रक्रिया म्हणून हा राजीनामा देण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी आसाममध्ये नवीन सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार असून सरमा पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेण्याची शक्यता आहे.

## टोल नाक्यांवर 'कृषी मॉल'; प्रवासात ताजी भाजी

**मुंबई :** राज्यातील टोल नाक्यांवर आता प्रवाशांना थेट शेतकऱ्यांकडून ताजी भाजी खरेदी करता येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यभरातील टोल नाक्यांजवळ 'कृषी मॉल' उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होईल. प्रवाशांना दर्जेदार शेतीमाल मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# गिरणा नदीची लूट उघडी!

## रिंगणगावात महसूलचा 'सर्जिकल स्ट्राइक'; अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा ट्रक रंगेहात जप्त

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल, जि. जळगाव |** तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीच्या वाढत्या प्रकारांवर अखेर महसूल प्रशासनाने कडक कारवाई करत मोठा धक्का दिला आहे. दि. ५ मे २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास रिंगणगाव शिवारात राबवलेल्या धडक मोहिमेत अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा ट्रक रंगेहात पकडण्यात आला. तहसीलदार गोपाळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या 'सर्जिकल स्ट्राइक'मुळे वाळू माफियांच्या जाळ्यात मोठी खळबळ उडाली असून प्रशासनाच्या कारवाईचे सर्वत्र स्वागत होत आहे.

गुप्त माहितीनंतर आखला सापळा मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, रिंगणगाव परिसरातील गिरणा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू होता. ही वाळू रात्रीच्या अंधारात ट्रकद्वारे विविध भागात पोहोचवली जात असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने काटेकोर नियोजन करून पहाटे सापळा रचला. संशयित हायवा ट्रक अडवून तपासणी केली असता चालकाकडे कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. तत्काळ कारवाई करत वाहन जप्त करून एरंडोल तहसील कार्यालयात जमा करण्यात आले.

नदीपात्रावर गंभीर परिणाम अवैध वाळू उपशामुळे गिरणा नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर गंभीर परिणाम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. नदीकाठच्या शेतजमिनींची धूप, भूजल पातळीत होणारी घट, तसेच पर्यावरणीय समतोल बिघडण्यास या बेकायदेशीर कृत्ये कारणीभूत ठरत आहेत. स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकांवरही याचा विपरीत परिणाम होत असून अनेक ठिकाणी शेतीयोग्य जमीन धोक्यात आली आहे.

कारवाईत अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग या धडक कारवाईत नायब तहसीलदार संजय घुले, मंडळ अधिकारी भरत पारधी, ग्राम महसूल अधिकारी वैभव पाठे, श्रीकांत कासुंदे, वीरेंद्र पालवे, संदीप पाटील, रविराज पाटील, पार्थ यादव आणि मयुर कुळकर्णी यांचा समावेश होता. सर्व पथकाने समन्वय साधत अचूक वेळी कारवाई केल्याने आरोपींना पळ काढण्याची संधी मिळाली नाही.

### प्रशासनाचा इशारा

: गय केली जाणार नाही महसूल प्रशासनाने या कारवाईनंतर स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांवर यापुढे अधिक कठोर कारवाई करण्यात येणार आहे. "गिरणा नदीची लूट थांबवण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे नुकसान रोखण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने राबवण्यात येतील," असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. स्थानिकांकडून दिलासा, पुढील कारवाईची अपेक्षा महसूल विभागाच्या या आक्रमक भूमिकेमुळे स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी या कारवाईचे स्वागत केले असून, पुढील काळात आणखी मोठ्या प्रमाणावर कारवाया व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### पर्यावरण रक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

एकूणच, रिंगणगावातील ही कारवाई केवळ एका ट्रकपुरती मर्यादित नसून, वाळू माफियांच्या संपूर्ण साखळीला दिलेला कडक इशारा मानला जात आहे. महसूल प्रशासनाच्या या धडाकेबाज मोहिमेमुळे गिरणा नदीचे संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असून, भविष्यात अशा कारवायांमुळे अवैध वाळू माफियांचा बिमोड होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## बिहारमध्ये आज मंत्रिमंडळ विस्तार; पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत २७ मंत्री घेणार शपथ

**पाटणा | प्रतिनिधी**



बिहारमधील सम्राट चौधरी सरकारच्या मंत्रिमंडळाचा बहुप्रतीक्षित विस्तार गुरुवारी, ७ मे रोजी ऐतिहासिक गांधी मैदानावर पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी विशेष उपस्थिती लावणार असून, पाटणा विमानतळ ते गांधी मैदान असा त्यांचा भव्य 'मेगा रोड शो' देखील आयोजित करण्यात आला आहे. १५ एप्रिल रोजी सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, मात्र इतर राज्यांतील निवडणुकांमुळे मंत्रिमंडळ विस्तार लांबणीवर पडला होता. उद्याच्या या शपथविधी सोहळ्याला गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, जदयूचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीश कुमार आणि एनडीएचे इतर दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. या मंत्रिमंडळ विस्तारात एकूण २७ नवीन मंत्री शपथ घेण्याची शक्यता आहे. मित्रपक्षांच्या संमतीने ठरलेल्या सूत्रानुसार, भाजपच्या कोट्यातून १२, तर संयुक्त जनता दलाच्या (जदयू) कोट्यातून ११ मंत्र्यांचा समावेश केला जाणार आहे. याशिवाय चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाला (रामविलास) २, तर हिंदुस्तानी आवाम मोर्चा (एचएएम) आणि राष्ट्रीय लोक मोर्चाला (आरएलएम) प्रत्येकी १ मंत्रिपद देण्यात येणार आहे. बिहार विधानसभेच्या संख्याबळानुसार जास्तीत जास्त ३६ मंत्री असू शकतात, मात्र भविष्यातील राजकीय समीकरणे लक्षात घेऊन ६ पदे सध्या रिक्त ठेवली जाणार आहेत. मंत्रिमंडळात जुन्या अनुभवी नेत्यांसह काही नवीन चेहऱ्यांनाही संधी मिळण्याचे संकेत आहेत. जदयूकडून अशोक चौधरी, श्रावण कुमार आणि लेसी सिंह यांसारख्या जुन्या चेहऱ्यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे, तर भाजपकडून विजय सिन्हा, मंगल पांडे, श्रेयसी सिंह आणि रामकृपाल यादव यांच्या नावांची चर्चा आहे. या विस्तारामुळे बिहारमध्ये आता खऱ्या अर्थाने पूर्णवेळ सरकार कार्यरत होणार असून, प्रशासकीय कामांना गती मिळणार आहे. पंतप्रधानांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण पाटणा शहरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून गांधी मैदानावर भव्य तयारी करण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

# तामिळनाडूत विजय यांचा सत्तेचा दावा

## बंगालमध्ये भाजप सरकारचा ९ मे रोजी शपथविधी

। जन सम्राट टाईम्स ।



**चेन्नई/कोलकाता :** तामिळनाडूत सुपरस्टार विजय यांनी सत्तेवर दावा सांगितला आहे. विजय यांनी बुधवारी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा मांडला आहे. त्यांना बहुमत सिद्ध करण्यासाठी ११८ जागांची गरज आहे. ५ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसने 'डीएमके'सोबतची दशकांची जुनी युती तोडून विजय यांच्या 'टीव्हीके'ला पाठिंबा जाहीर केला आहे. तर, पश्चिम बंगालमध्ये भाजप सरकारचा शपथविधी ९ मे रोजी, रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंतीदिनी - 'पचिशे बोईशाख' मुहूर्तावर होणार आहे. दरम्यान, बुधवारी सकाळी कोलकाता पोलिसांनी ममता बॅनर्जी आणि त्यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या निवासस्थानाबाहेरील अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था हटवली आहे.

पश्चिम बंगालमध्ये भाजपचे वर्चस्व आणि तामिळनाडूमध्ये चित्रपटसृष्टीतून राजकारणात आलेल्या विजय यांचा उदय हे २०२६ मधील भारतीय राजकारणातील सर्वात मोठे बदल मानले जात आहेत. तामिळनाडूच्या राजकारणात ५० वर्षांनंतर तिसऱ्या शक्तीचा उदय झाला आहे. अभिनेता विजय यांच्या तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके)पक्षाने १०८ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून झेप घेतली आहे. विजय याच्या पक्षाने 'द्रविडी' राजकारणाला धक्का देत सत्तेवर दावा ठोकला आहे. टीव्हीके आणि काँग्रेसकडे ११३ जागा आहेत. बहुमत सिद्ध करण्यासाठी विजय हे सीपीआय, सीपीएम, व्हीसीके वैगेरे इतर छोट्या पक्षांशी बोलणी करत आहेत. या ऐतिहासिक बदलामुळे डीएमके (५९ जागा) आणि एआयएडीएमके (४७ जागा) यांना मोठा धक्का बसला आहे. पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षांची तृणमूलची सत्ता उलथवून भाजप पहिल्यांदाच सत्तेत येत आहे. भाजपने २९४ पैकी २०७ जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी पुष्टी केली आहे की, नवीन सरकारचा शपथविधी ९ मे २०२६ रोजी पार पडेल. या निवडणुकीत, तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले असून, ममता बॅनर्जी यांनी आपला भवानीपूर हा बालेकिल्ला गमावला आहे.

### ममता आणि अभिषेक यांची सुरक्षा घटवली

सत्तांतरानंतर तातडीने प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. ममता बॅनर्जी आणि त्यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या सुरक्षेत कपात करण्यात आली आहे. त्यांना यापुढे केवळ 'झेड प्लस' सुरक्षा राहील. कालीघाट येथील ममतांचे निवासस्थान आणि अभिषेक यांच्या कॅमॅक स्ट्रीट येथील कार्यालयाबाहेरील हाय-टेक सीझर बॅरिकेड्स हटवून सामान्य रेलिंग लावण्यात आली आहे. मुख्यमंत्रिपदासाठी असलेली अतिरिक्त फौज मागे घेण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# पाकिस्तानी खेळाडूंना भारताचे दरवाजे खुले!

## अटी लागू; द्विपक्षीय मालिकांवर 'नो-एन्ट्री'



जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | विशेष प्रतिनिधी**
भारत सरकारने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या संदर्भात एक अत्यंत महत्त्वाचा आणि धोरणात्मक निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने बहुपक्षीय क्रीडा स्पर्धांसाठी पाकिस्तानी खेळाडूंना भारतात येण्यास 'ग्रीन सिग्नल' दिला आहे. मात्र, दोन्ही देशांमधील द्विपक्षीय क्रीडा संबंधांवरील बंदी अद्याप कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे भारत-पाकिस्तानमधील तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर क्रीडा क्षेत्रासाठी ही एक मोठी अपडेट मानली जात आहे. केंद्र सरकारच्या नव्या धोरणानुसार, भारतात जागतिक स्तरावरील कोणतीही विश्वचषक, आशिया चषक, चॅम्पियन्स ट्रॉफी किंवा ऑलिम्पिक पात्रता फेरी अशी मोठी स्पर्धा आयोजित केली जात असेल, तर त्यामध्ये सहभागी होण्यासाठी पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा दिला जाईल. आयसीसी, आयओसी अशा आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनांच्या नियमांचे पालन करणे आणि भारताची 'स्पोर्टिंग हब' म्हणून प्रतिमा जपणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. भारताने खेळाला आणि आंतरराष्ट्रीय नियमांना महत्त्व देतानाच आपल्या 'सुरक्षा आणि धोरणात्मक' भूमिकेशी कोणतीही तडजोड केलेली नाही.

### द्विपक्षीय मालिकांवर बंदी कायम

पाकिस्तानी खेळाडूंना भारतात येण्याची मुभा मिळाली असली, तरी भारत आणि पाकिस्तान दरम्यान होणाऱ्या स्वतंत्र मालिकांवर बंदी कायम आहे. जोपर्यंत सीमापार दहशतवाद थांबत नाही, तोपर्यंत पाकिस्तानसोबत कोणतीही क्रिकेट किंवा अन्य खेळाची द्विपक्षीय मालिका खेळली जाणार नाही, ही भारताची भूमिका कायम आहे.

### आंतरराष्ट्रीय दबावाचा परिणाम?

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) आणि इतर जागतिक संस्थांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते की, जर भारत कोणत्याही देशाच्या खेळाडूंना येण्यापासून रोखत असेल, तर भारताला जागतिक स्पर्धांचे यजमानपद मिळणे कठीण होईल. भारताने यापूर्वी २०१८-१९ मध्ये काही पाकिस्तानी नेमबाजांना व्हिसा नाकारला होता, ज्यामुळे मोठा वाद झाला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, भारताने आपल्या धोरणात स्पष्टता आणली आहे.

# नशिराबादमध्ये मतदार यादी परीक्षण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## दोन दिवसांत सुमारे १२०० नागरिकांनी तपासली नावे; उपनगराध्यक्ष पंकज महाजन यांचा पुढाकार

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद :** लोकशाही प्रक्रियेची पायाभरणी मजबूत करण्यासाठी मतदार यादी अचूक आणि अद्ययावत असणे अत्यावश्यक आहे. याच उद्देशाने नशिराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मतदार यादी विशेष सखोल परीक्षण' (SIR) मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ४ आणि ५ मे रोजी पार पडलेल्या या दोन दिवसीय कॅम्पमध्ये सुमारे ११०० ते १२०० नागरिकांनी सहभागी होत आपल्या नावांची खात्री करून घेतली.

### या उपक्रमाचे आयोजन

उपनगराध्यक्ष पंकज महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. अनेकदा स्थलांतर किंवा तांत्रिक कारणांमुळे मतदारांची नावे यादीतून वगळली जातात. ऐन निवडणुकीच्या वेळी होणारी गैरसोय टाळण्यासाठी हा विशेष कॅम्प राबवण्यात आला. "मतदार यादीत नाव असणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य आहे. नाव वगळल्यानंतर पुन्हा समाविष्ट करणे अवघड होते, त्यामुळे आधीच तपासणी करणे गरजेचे आहे," असे पंकज महाजन यांनी सांगितले. शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आयोजित या कॅम्पमध्ये संबंधित बीएलओ (BLO) अधिकारी उपस्थित होते. त्यांनी मतदारांना मतदान ओळखपत्राच्या आधारे नाव शोधणे, दुरुस्ती करणे आणि आवश्यक मार्गदर्शन दिले. विशेष म्हणजे, सायंकाळी ५ ते रात्री १० अशी वेळ ठेवण्यात आल्यामुळे नोकरी-व्यवसाय सांभाळणाऱ्या नागरिकांनाही सहभागी होता आले.

२००२ च्या मतदार यादीचा आधार घेत नाव शोधण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली होती. विठ्ठल मंदिर परिसरातील या कॅम्पमध्ये तरुण मतदारांसह ज्येष्ठ नागरिकांची मोठी उपस्थिती दिसून आली. एकूणच, नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे ही मोहीम अत्यंत यशस्वी ठरली असून, आगामी निवडणुकांसाठी नशिराबादची मतदार यादी अधिक अचूक आणि निर्दोष होण्यास मदत होणार आहे.

# नशिराबादकरांच्या सुरक्षेसाठी नगराध्यक्ष आक्रमक

## राष्ट्रीय महामार्गावर २७ मीटर भुयारी मार्गाची मागणी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद :** नशिराबाद शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर वाढत्या अपघातांच्या घटना आणि सततची वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर शहराच्या सुरक्षिततेसाठी ठोस पाऊल उचलत नगराध्यक्ष श्री. योगेश नारायण पाटील यांनी नशिराबाद येथे २७ मीटर लांबीचा भुयारी मार्ग (अंडरपास) उभारण्याची आग्रही मागणी प्रशासनाकडे केली आहे. या प्रस्तावामुळे शहरातील धोकादायक परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धोकादायक परिस्थितीकडे वेध; जीव मुठीत धरून रस्ता ओलांडण्याची वेळ नगराध्यक्ष योगेश पाटील यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन महामार्गावरील प्रत्यक्ष परिस्थिती मांडली. शहरातील शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी यांना महामार्ग ओलांडताना अक्षरशः जीव धोक्यात घालावा लागतो.

विशेषतः महालक्ष्मी मंदिर परिसरात अपुऱ्या प्रकाश व्यवस्थेमुळे रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिकच वाढतो. वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अनेकदा जीवघेणे प्रसंग ओढवतात. या गंभीर बाबींकडे प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीच्या उपाययोजनांची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. भुयारी मार्गामुळे होणारे फायदे प्रस्तावित २७ मीटर अंडरपास उभारल्यास शहराला अनेक पातळ्यांव दिलासा मिळणार आहे. अपघातांवर नियंत्रण: महामार्गावरील जीवघेणे अपघात मोठ्या प्रमाणात कमी होतील. वाहतूक सुरळीत: सध्या विस्कळीत असलेली वाहतूक अधिक वेगवान व नियोजित होईल. नागरिकांची सुरक्षितता: विद्यार्थी, महिला व ज्येष्ठांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडता येईल.

# भाजपचा प्रत्येक सहावा खासदार 'मतचोर!

## राहुल गांधी यांचा घणाघात

जन सम्राट टाईम्स



**नवी दिल्ली | विशेष प्रतिनिधी :** पश्चिम बंगाल आणि आसाम विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर देशातील राजकीय वातावरण तापले असून काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. "भाजपचा प्रत्येक सहावा खासदार मतचोरी करून निवडून आला आहे," असा गंभीर आरोप करत त्यांनी सत्ताधारी पक्षावर थेट निशाणा साधला.

### '४० खासदार मतचोरीतून' – राहुल गांधींचा दावा

राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रतिक्रिया देताना म्हटले की, "भाजपचे सुमारे ४० खासदार (२४० पैकी) लोकशाही पद्धतीने नव्हे, तर मतांच्या चोरीमुळे संसदेत पोहोचले आहेत."

भाजपने प्रचारात वापरलेल्या 'घुसखोर' या शब्दाचा संदर्भ देत त्यांनी उपरोधिक टीका केली – "खरे घुसखोर हेच आहेत, ज्यांनी जनतेच्या मतांवर डल्ला मारून संसदेत प्रवेश केला."

निवडणूक यंत्रणांवरही सवाल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेवर देखील प्रश्न उपस्थित केले. "देशातील महत्त्वाच्या संस्था आज रिमोट कंट्रोलने चालवल्या जात आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष असती, तर भाजपला १४० जागाही जिंकता आल्या नसत्या," असा दावा त्यांनी केला. बंगाल–आसाम निकालांची पार्श्वभूमी या आरोपांची पार्श्वभूमी नुकत्याच लागलेल्या दोन राज्यांच्या निकालांशी जोडली जात आहे:

**पश्चिम बंगाल:** भाजपने बहुमत मिळवत ममता बॅनर्जींच्या सत्तेला धक्का

**आसाम:** एनडीए आघाडीने १०२ जागांसह सत्ता कायम ठेवत हॅट्रिक बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा भवानीपूर मतदारसंघातील पराभव हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. बॅनर्जी यांनीही राहुल गांधींच्या सुरात सूर मिसळत "किमान १०० जागा भाजपने लुटल्या" असा आरोप केला आहे.

भाजपचे जोरदार प्रत्युत्तर राहुल गांधींच्या आरोपांना भाजपने कडक शब्दांत उत्तर दिले. "जनतेने दिलेला स्पष्ट कौल नाकारून विरोधक लोकशाहीचा अपमान करत आहेत.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# नशिराबादमध्ये 'निर्माल्य' प्रश्न ऐरणीवर!

## घरगुती व मंदिरांतील पवित्र अवशेषांच्या व्यवस्थापनासाठी 'कलश गाडी'ची नागरिकांची जोरदार मागणी

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद :** सुमारे २५ हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या नशिराबाद शहरात सध्या एक वेगळाच पण अत्यंत संवेदनशील प्रश्न ऐरणीवर आला आहे — घरगुती पूजाअर्चा आणि मंदिरांमधून निघणाऱ्या 'निर्माल्या'च्या व्यवस्थापनाचा. दररोज मोठ्या प्रमाणावर जमा होणाऱ्या या पवित्र अवशेषांच्या संकलनासाठी नगर परिषदेकडे कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र 'कलश गाडी' सुरू करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

पवित्रतेचा प्रश्न की कचऱ्याचा? नागरिकांच्या मते, देवपूजेत वापरलेली फुले, हार, पाने, नारळाचे तुकडे यांसारखे निर्माल्य हे केवळ कचरा नसून श्रद्धेचा अविभाज्य भाग आहे. मात्र, सध्या या निर्माल्याला इतर ओल्या-सुक्या कचऱ्यासोबत टाकावे लागत असल्याने भाविकांच्या भावना दुखावल्या जात आहेत.

यामुळे अनेकजण निर्माल्य पिशव्यांमध्ये भरून झाडांच्या मुळाशी, रस्त्याच्या कडेला किंवा नदीपात्रात टाकत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. परिणामी, पर्यावरण प्रदूषण वाढत असून शहराच्या स्वच्छतेवरही परिणाम होत आहे.

### निर्माल्य व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणेची गरज

नागरिकांनी प्रशासनाकडे काही ठोस मागण्या मांडल्या आहेत:

स्वतंत्र 'कलश गाडी': घंटागाडीप्रमाणेच केवळ निर्माल्य गोळा करण्यासाठी वेगळी गाडी सुरू करावी

पावित्र्य जपून विल्हेवाट: संकलित निर्माल्य इतर कचऱ्यात न मिसळता धार्मिक पद्धतीने त्याची विल्हेवाट लावावी

### पर्यावरण संरक्षण: नदीपात्रात किंवा सार्वजनिक ठिकाणी निर्माल्य टाकण्याची प्रथा थांबवावी

श्रद्धा आणि स्वच्छता यांचा समतोल साधण्याची गरज स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, "निर्माल्य हा कचरा नसून तो आमच्या श्रद्धेचा भाग आहे. योग्य व्यवस्थापन झाल्यास शहर स्वच्छ राहील आणि धार्मिक भावनांचाही आदर राखला जाईल." सध्या अनेक शहरांमध्ये 'निर्माल्य रथ' किंवा 'कलश गाडी'च्या माध्यमातून हा प्रश्न प्रभावीपणे सोडवण्यात आला आहे. त्याच धर्तीवर नशिराबादमध्येही अशी योजना राबवण्याची मागणी होत आहे. प्रशासनाची कसोटी नशिराबाद नगर परिषदेपुढे आता श्रद्धा, पर्यावरण आणि स्वच्छता या तिन्हींचा समतोल राखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. नागरिकांच्या वाढत्या मागणीची दखल घेत प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेतल्यास शहरासाठी हा एक आदर्श उपक्रम ठरू शकतो. एकूणच, नशिराबादमध्ये 'निर्माल्य' प्रश्न केवळ व्यवस्थापनाचा नसून भावना आणि पर्यावरणाशी निगडित आहे. 'कलश गाडी'सारखी संकल्पना राबवली तर शहर स्वच्छतेसोबतच श्रद्धेचाही मान राखला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.